रेग्यु. दिवाणी मु.नं.५३९/१९
राजकुमार निंबाळकर वि.व्यंकटराव निंबाळकर
CNR NO.MHST140026732019

नि.१० आणि १२ खालील संयुक्तीक आदेश

१. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचे निशाणी १० आणि १२ वरील अर्ज हे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचे अर्जासोबत प्रतिवादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे कथन असे की सदर दाव्यात दि.१४/८/२०२० रोजी वकिलामार्फत हजर झाले. दाव्याची कैफियत देण्यास ९० दिवसाचे आत देणे आवश्यक व गरजेचे होते. परंतु मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द विनाकैफियत आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादीचे कथन की, कोरोना महामारीमुळे सप्टेंबर २०२० पासुन मौजे तावडी गावात शासनातर्फे कडक निर्बध लागु केल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे कोर्टात हजर राहु शकले नाहीत व मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यानंतर ऑगष्ट २०२१ मध्ये प्रतिवादी क्र.२ यांची कोरोना टेस्ट पॉझीटीव आल्यामुळे डॉक्टराकरवी उपचार घेतलेनंतर त्यांना सक्तीची विश्रंती घेणेचा सल्ला दिला होता. प्रतिवादी क्र. १ हे वयोवृध्द आहेत तसेच गगप्रतिवादी क्र. ३ व ४ हे कामधंदानिमित्त बाहेर गावी असलेमुळे व तसेच कोरोना महामारीमुळे निर्बध असलेमुळे न्यायालयात येवु शकले नाहीत. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास ५९७ दिवसांचा विलंब झाला. प्रतिवादी पुढे कथन करतात की मुदतीमध्ये कैफियत दाखल न केल्यामुळे त्यांचेविरुध्द विनाकैफियतचा आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादींची कैफियत दखल करुन घेणे न्यायाचेदृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे तसे न झाल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल म्हणुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुतचे अर्जास आक्षेस घेतला असुन त्यांचे म्हणणे की पतिवादींना सुमारे दीड वर्षाचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब योग्य प्रकारे सांगितलेला नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा म्हणुन विनंती केली आहे. तसेच प्रतिवादींना रु.३०००/- कॉस्ट देणेची विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले.

५. वादीने प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीसंबंधी सरकारी मोजणी खात्यामार्फत फाळणी होवुन मिळणेसाठी तसेच दावा मिळकतीचे वाटणी होवुन मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. अभिलेखानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दि. ११/२/२०२२ रोजी प्रस्तुत दाव्यात हजर झाले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दि.९/३/२०२० रोजी समन्सची बजावणी झाली. अभिलेखानुसार प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द विना कैफियतचा आदेश पारीत झालेला नाही. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेल्या कारणांचा विचार करता मार्च २०२० ते ऑगष्ट २०२१ पावेतो कोरोना महामारीमुळे न्यायालयाचे कामकाजावर मर्यादा होत्या. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दाव्यात मुदतीमध्ये हजर होवु शकले नाहीत. ही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची कारणे संयुक्तीक वाटतात. अभिलेखानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ विरुध्द विना कैफियतचा आदेश पारीत झालेला नाही. परंतु भविष्यात तांfत्रक अडचण असु नये म्हणुन प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादींचे अर्ज मंजुर केल्यास वादीचे कुठलेही काहीएक नुकसान होणार नाही. मात्र अर्ज मंजुर झालेस दावा हा गुणवत्तेवर चालणेस मदत होईल. प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेली कारणे पाहता प्रतिवादींचा अर्ज विनाअट मंजुर करणे न्यायोचित होईल म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१० आणि १२ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब हा माफ करण्यात येतो. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची कैफियत ही दाखल करुन घेण्यात येते.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT, o=BOMBAY HIGH COURT, st=MAHARASHTRA, c=IN
Date: 2022.08.06 11:24:46 +0530

फलटण. (पी. एच. पाटील)

ता.०५/०८/२०२२. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तरफलटण.